**CNR : MHST07-000475-2007**

**नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ८३/२००७**

महेश कृष्णराव निकम ..... **वादी**

**वि.**

श्रीमती आक्काताई सोपान हादगिरे वगैरे.... **प्रतिवादी**

**नि. १०८ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने पुरावा बंदचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. सदरची केस प्रतिवादीचा पुढील पुरावा देणेवर ता.१६/०९/२०१९ रोजी नेमली होती. त्या दिवशी प्रतिवादीचे वकिल बार कौन्सीलचे कामानिमीत्त ना. हायकोर्टमध्ये गेलेने त्या दिवशी तसा मुदतीचा अर्ज दिला होता. तो अर्ज नामंजूर करुन पुढील तारीख २३/०९/२०१९ अशी ठेवली होती. दि.२३/०९/२०१९ रोजी साक्षीसमन्सचा अर्ज प्रतिवादीने तयार करुन देण्यासाठी आले असता सदरचा नंबर बोर्डवर नव्हता. त्याबाबत चौकशी केली असता त्याची पुढील तारीख ०७/१०/२०१९ रोजी दिलेली असल्याचे समजले. त्यामुळे त्या दिवशी साक्षीसमन्सचा अर्ज देण्याचे राहून गेले. तारीख ०७/१०/२०१९ रोजी साक्षीसमन्सचा अर्ज प्रतिवादीने मे. कोर्टात दिला. परंतु त्यापुर्वीच दि.२३/०९/२०१९ रोजी प्रतिवादीचा पुरावा बंद असा आदेश झाल्याने तो अर्ज दप्तरी दाखल करुन घेण्यात आला. वरील परिस्थितीत न्यायाचे दृष्टीने सदरचा आदेश रद्द होऊन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. वादीने सदर अर्जावर म्हणणे देऊन अर्जास तीव्र विरोध केला आहे. वादीचे निवेदन असे की, प्रस्तुतचा अर्ज

प्रामाणिकपणाचा नाही. प्रतिवादींना संधी देऊनही त्यांनी पुरावा दिलेला नाही. केवळ दाव्याचे काम लांबविण्याकरता प्रतिवादी जाणीवपुर्वक विलंब करीत आहेत. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. वादी व प्रतिवादी यांनी अर्ज म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून कायमची व निरंतराची ताकीद मिळणेसाठी केलेला असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. प्रतिवादीला पुरावा देणेची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. तसेच वादीस प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार असल्याने त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचेविरुध्द दि. २३/०९/२०१९ रोजी पुरावा बंद केल्याचा केलेला आदेश रद्द केला आहे.

Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2020.03.16 16:37:16 +0530

कराड. **(प्र. अ. सवदीकर)**
दि. १६/०३/२०२० सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड